# Washim District Police

**Nature of Work** :- अपहार करणाऱ्या आरोपीस अटक.

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **01/06/2022**

**Brief of the work done :-**

'महिला उत्कर्ष प्रतिष्ठाण'मध्ये अपहार करणाऱ्या आरोपीस अटक.

---

# अपहार प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**वाशिम** : पोलीस ठाणे रिसोड जि.वाशिम येथे दि . 12/05/2020 रोजी फिर्यादी श्रीमती भावनाताई पुंडलिकराव गवळी , वय 50 वर्षे , रा . रिसोड , अध्यक्षा महिला उत्कर्ष प्रतिष्ठाण रिसोड व जनशिक्षण संस्था वाशिम यांनी फिर्याद दिली आहे की , आरोपी अशोक नारायणराव गांडोळे व इतर यांनी महिला उत्कर्ष प्रतिष्ठाण रिसोड व जनशिक्षण संस्था वाशिम यांच्या मार्फतीने चालविले जाणारे आयुर्वेदिक बी.ए.एम.एस. महाविद्यालय , बी . फार्म , डी . फार्म व भावना पब्लीक स्कुल देगांव येथे सचिव , संचालक , कर्मचारी , सदस्य पदावर असताना सन 2008 ते जुलै 2019 पर्यंत विदयार्थ्यांची शैक्षणिक फी व शासनाकडुन मिळणारे शैक्षणिक अनुदान या मधील 18,18,40,867 / - रू रक्कमेचा अपहार केला असुन अपहारीत रक्कमेमधुन स्वतःच्या फायदयासाठी वेगवगेळ्या ठिकाणी स्थावर व जंगम मालमत्ता खरेदी केल्या आहेत . अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून अपराध क . 389/2020 , कलम 406 , 408 , 420 , 34 भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदर तपासामधे आरोपींनी संस्थेत अनियमीतता करुन अपहारीत केलेली रक्कम 19,85,42,756 / - रु असल्याचे निष्पन्न झाले आहे . नमुद गुन्हयात कलम 409 , 468 , 471 , 4773 , 120 ब भा.दं.वि. व भ्रष्ट्राचार प्रतिबंधक ( सुधारणा ) अधिनियम 2018 कलम 7 , 13 ( 1 ) ( अ ) ( ब ) . 13 ( 2 ) समाविष्ठ करण्यात आले आहे . नमुद गुन्हयातील आरोपींनी वि . उच्च न्यायालय खंडपिठ , नागपुर येथे नमुद गुन्हयाची प्रथम खबर रदद करण्यासाठी अर्ज केले होते . दिनांक 24/02/2022 रोजी वि . उच्च न्यायालय नागपुर यांनी आरोपींनी केलेले अर्ज रदद केले . त्यानंतर आरोपींनी वि . जिल्हा व सत्र न्यायालय , वाशिम येथे कलम 438 अटकपूर्व जामीन मिळणेकरीता अर्ज केले होते . आरोपींचे अर्ज रदद झाल्यापासुन गुन्हयातील आरोपी फरार झाले होते . बच्चन सिंग पोलीस अधिक्षक , वाशिम यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हयातील मास्टरमाईड आरोपी संतोष बद्रीप्रसाद सोमाणी वय 45 वर्ष रा . केशवनगर ता . रिसोड जि . वाशिम हा जालना येथे असल्याबाबत गोपनिय माहिती मिळाल्याने आरोपी शोध पथकातील सपोनि . विजय जाधव स्थागुशा व पथक यांनी आरोपी संतोष बद्रीप्रसाद सोमाणी याला जालना येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. बच्चन सिंह पोलीस अधिक्षक , वाशिम यांचे मार्गदर्शनात पुढील तपास चालु आहे .